केंद्र पुरस्कृत (Central Sector Scheme) "सिल्क समग्र-२" (ISDSI) योजनेंतर्गत अनुसूचित जाती प्रवर्गातील ७८ लाभार्थ्यांकरिता निधी वितरीत व खर्च करण्यास मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
शासन निर्णय क्रमांक : सपवि ४००१२/२७/२०२५-DESK SERICULTURE -CMTD
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-४०००३२
दिनांक: २७ मार्च, २०२६.

वाचा :-

१) शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, क्र.प्रावियो-२०१८/प्र.क्र. ९०/रेशीम कक्ष, दिनांक ९ फेब्रुवारी, २०२४.
२) केंद्रीय रेशीम मंडळाचे पत्र क्र.CSB-३७/१/ CSs(SS-२) Maharashtra/२०२१-२६/ Vol.१, दिनांक २३ नोव्हेंबर, २०२३.
३) शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, क्र.केपूयो-११२३/प्र.क्र. ६० /रेशीम कक्ष, दिनांक ३१ मार्च, २०२४.
४) केंद्रीय रेशीम मंडळाचे पत्र क्र.CSB-३७/१/ CSs(SS-२) Maharashtra/२०२१-२६/ TS दिनांक १२ जुन,२०२५.
५) केंद्रीय रेशीम मंडळाचे पत्र क्र.CSB-३७/१/ CSs(SS-२) Maharashtra/२०२१-२६/ Vol.१, दिनांक १८ जुलै,२०२५.
६) शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, क्र.सपवि ४००१३/१/२०२५ DESKSERICULTURE CMTD, दिनांक २७ मार्च, २०२५.
७) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र.अर्थसं-२०२५/प्र.क्र.४४/अर्थ-३, दि.७ एप्रिल, २०२५ व १२ मार्च,२०२६.
८) संचालक (रेशीम) यांचे पत्र क्र.रेशीम/कार्यासन-९/सिल्क समग्र-२/ अ.ज/सन-२६/०३, दिनांक १ जानेवारी, २०२६.

प्रस्तावना : -

केंद्र पुरस्कृत (Central Sector Scheme) "सिल्क समग्र-२" (ISDSI) योजना सन २०२१-२२ ते २०२५-२६ या कालावधीत राज्यात राबविण्यास संदर्भाधिन दि.९ फेब्रुवारी, २०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. केंद्र पुरस्कृत "सिल्क समग्र-२" (ISDSI) योजनेंतर्गत सन २०२३-२४ मध्ये अनुसूचित जाती या प्रवर्गातील लाभार्थ्यासाठी प्राप्त केंद्र हिस्सा ₹२०५.८४४ लक्ष पैकी अखर्चित राहीलेला मागील वर्षीचा ₹९५.४७४ लक्ष इतका निधी सन २०२५-२६ या वर्षात वापरण्यास केंद्रीय रेशीम मंडळाने दि.१२.०६.२०२५ रोजी दिलेल्या मान्यतेनुसार रेशीम संचालनालयाने सादर केलेल्या अनुसूचित जाती या प्रवर्गातील ७८ लाभार्थ्यांच्या प्रस्तावाकरिता केंद्र हिस्सा ₹६०.०१७५ लक्ष व त्यास पूरक राज्य हिस्सा ₹२२.५६८ लक्ष असा एकूण ₹८२.५८५ लक्ष इतका निधी वितरीत व खर्च करण्यास वित्त विभागाने मान्यता दिली आहे. त्या अनुषंगाने केंद्र पुरस्कृत

सिल्क समग्र-२ अंतर्गत अनुसूचित जाती या प्रवर्गातील ७८ लाभार्थ्याकरिता केंद्र हिस्सा व त्यास पुरक राज्य हिश्शाची रक्कम वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय</u> :

केंद्र पुरस्कृत (Central Sector Scheme) "सिल्क समग्र-२" (ISDSI) अंतर्गत सन २०२३-२४ मधील अनूसूचित जमाती लाभार्थ्यांसाठीचा अखर्चित केंद्र हिस्सा ₹२०५.८४४ लक्षपैकी प्रकल्प मंजूर समितीने मान्यता दिलेल्या ७७ लाभार्थ्याकरिता केंद्र हिस्सा ₹११०.४१ लक्ष व त्यास पूरक राज्य हिस्सा ₹४२.४७ लक्ष असा एकूण ₹१५२.८८ लक्ष इतका निधी संदर्भाधीन शासन निर्णय दि.२९ मार्च, २०२५ अन्वये वितरीत व खर्च करण्यात आलेला आहे.उर्वरित अखर्चित असलेल्या केंद्र हिस्सा ₹९५.४७४ लक्षपैकी रेशीम संचालनालयाने सादर केलेल्या ७८ अनुसूचित जाती या प्रवर्गातील लाभार्थ्यांच्या प्रस्तावाकरिता केंद्र हिस्सा ₹६०.०१७५ लक्ष व त्यास व त्यास पूरक राज्य हिस्सा ₹२२.५६८ लक्ष असा एकूण ₹८२.५८५ लक्ष इतका निधी पुढील तक्त्यात नमूद केलेल्या बाबींसाठी वितरीत व खर्च करण्यास याद्वारे मान्यता देण्यात येत आहे :-

(रुपये लाखात)

अ. क्र.	बाब	युनीट कॉस्ट	के.रे.मंडळाकडून मंजूर लाभार्थी संख्या	हिस्साचे प्रमाणे (केंद्र: राज्य : लाभार्थी)	निधी मागणी तपशिल			
					निधी मागणी लाभार्थी संख्या	केंद्र हिस्सा	राज्य हिस्सा	एकूण रक्कम
१	तुती लागवड (१ एकर)	०.६०	८७	६५:२५:१०	२८	१०.९२०	४.२००	१९.९८०
२.	कीटक संगोपनगृह बांधकाम मॉडेल -II	३.२५	४४	६५:२५:१०	२१	४४.३६३	१७.०६३	६१.४२५
३	ठिंबक सिचन - १ एकर	०.६०	०६	६५:२५:१०	०३	१.१३०	०.४३०	१.५६०
४	कीटक संगोपन साहित्य (१ एकर)	०.५०	२२	६५:२५:१०	०७	२.२७५	०.८७५	३.१५०
४	लाभार्थी सक्षमीकरण	०.०७	४२	१००:००:००	१९	१.३३०	०.००	१.३३०
	एकूण		**२०८**		**७८**	**६०.०१७५**	**२२.५६८**	**८२.५८५**

२. सदर निधी केंद्र पुरस्कृत (Central Sector Scheme) "सिल्क समग्र-२" (ISDSI) सुधारीत मानकांना दिलेल्या प्रशासकीय मंजूरीनुसार व त्या संदर्भातील मार्गदर्शक सुचनांनुसार संचालक (रेशीम) यांनी खर्च करावा. तसेच, ज्या योजनांसाठी व बाबींसाठी केंद्र शासनाने निधी उपलब्ध केला आहे, त्याच बाबींवर सदर निधी खर्च होईल याची दक्षता घ्यावी. वितरीत करण्यात आलेल्या निधीतून

झालेल्या खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र केंद्रीय रेशीम मंडळ व शासनास विहीत मुदतीत सादर करण्याची कार्यवाही संचालक (रेशीम) यांनी करावी.

३. सन २०२५-२६ या वित्तीय वर्षामधील उपलब्ध तरतूदीमधून मागील वर्षातील निधी खर्च करतांना, वित्तीय अधिकार नियमपुस्तिका यामधील वित्तीय नियम, प्रचलित अटी व शर्तीचे तसेच आदिवासी विकास विभाग, नियोजन विभाग व वित्त विभागाने वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्याच्या अटीच्या अधीन राहून मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

४. सदर योजनेंतर्गत अनुदान देताना महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, नानाजी देशमुख कृषि संजिवनी योजना (पोक्रा) व इतर शासकीय योजनेंतर्गत लाभ दिला नसल्याची खात्री करुनच पात्र लाभार्थ्यांना अनुदान अदा करण्याची कार्यवाही संचालक (रेशीम) यांनी करावी.

५. सदर योजनेचा लाभ डीबीटी प्रणालीच्या मार्गदर्शक सुचनांप्रमाणे लाभार्थ्यांना अदा करण्याची कार्यवाही करावी.

६. सदर योजनेंतर्गत लाभार्थ्यांनी लाभ घेतलेल्या बाबीअंतर्गत उभारण्यात आलेल्या मालमत्तेचे जीओ टॅगीग करणे बंधनकारक राहील.

७. सदर योजनेचा लाभ दिल्यांनतर/अंमलबजावणीनंतर प्रकल्प/लाभार्थी केंद्रित घटकांचे व्हिडिओ दस्तऐवजीकरण करणे बंधनकारक असून याबाबतची कार्यवाही संचालक (रेशीम) यांनी करावी.

८. सदर योजनेंखाली केंद्र हिश्श्यासाठी ₹६०.०१७५ लक्ष (अक्षरी रुपये साठ लक्ष एक हजार सातशे पन्नास फक्त) इतकी रक्कम वितरीत करण्यात येत असून उक्त खर्च हा “मागणी क्र.एन-३, २८५१, ग्रामोद्योग व लघुउद्योग,००, ७८९, अनुसूचित जातीसाठी विशेष घटक योजना, (०१) अनुसूचित जाती घटक कार्यक्रमांतर्गत योजना, (०१) (०४) रेशीम उद्योगाचा विकास सिल्क समग्र (केंद्र हिस्सा ६५ टक्के)(२८५१ ७४९२), ३१, सहायक अनुदाने (वेतनेतर)” अंतर्गत सन २०२५-२६ या वित्तीय वर्षासाठी उपलब्ध असलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

तसेच, राज्य हिश्श्यासाठी ₹ २२.५६८ लक्ष (अक्षरी रुपये बावीस लक्ष छप्पन हजार आठशे फक्त) इतकी रक्कम वितरीत करण्यात येत असून उक्त खर्च हा ““मागणी क्र.एन-३, २८५१, ग्रामोद्योग व लघुउद्योग,००, ७८९, अनुसूचित जातीसाठी विशेष घटक योजना, (०१) अनुसूचित जाती घटक कार्यक्रमांतर्गत योजना, (०१) (०५) रेशीम उद्योगाचा विकास सिल्क समग्र (राज्य हिस्सा २५ टक्के) (२८५१ ७४८१), ३१, सहायक अनुदाने (वेतनेतर)” अंतर्गत सन २०२५-२६ या वित्तीय वर्षासाठी उपलब्ध असलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

९. उक्त निधी कोषागारातून आहरण व संवितरण करण्यासाठी संचालक, रेशीम संचालनालय, नागपूर यांना नियंत्रण अधिकारी (V०००३) म्हणून प्राधिकृत करण्यात येत आहे. उक्त निधी अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीवर संचालक, रेशीम संचालनालय, नागपूर यांचे अधिनस्त सुपूर्द करण्यात येत आहे. संचालक (रेशीम) यांनी सदर रक्कम संबंधीत आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना वितरीत करण्याची कार्यवाही करावी.

१०. सदर शासन निर्णय सामाजिक न्याय विभाग यांच्या सहमतीने तसेच, वित्त विभागाने अनौपचारिक संदर्भ क्र. ३८१/व्यय-१४/ दि.२६.०३.२०२६ अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

११. सदर शासन निर्णय हा महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक क्र. २०२६०३२७२०१७२२०९०२ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by PAWAR TUSHAR PITAMBAR
Date: 2026.03.27 20:18:15 +05'30'

(डॉ.तुषार पवार)
उपसचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१) मा.मंत्री (वस्त्रोद्योग) यांचे खाजगी सचिव
२) प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई.
३) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा), महाराष्ट्र-२, नागपूर.
४) अ.मु.स. (वित्त) वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
५) प्रधान सचिव (वस्त्रोद्योग) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
६) प्रधान सचिव (सामाजिक न्याय विभाग) मंत्रालय, मुंबई.
७) सदस्य-सचिव, केंद्रीय रेशीम मंडळ, बंगळूरु.
८) आयुक्त, समाज कल्याण,पूणे.
९) सह सचिव (अर्थसंकल्प) सामाजिक न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०) उप सचिव (अर्थसंकल्प) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई .
११) संचालक, रेशीम संचालनालय, नागपूर.
१२) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
१३) नियोजन विभाग (का-१४३१), मंत्रालय, मुंबई.
१४) वित्त विभाग (व्यय-२/व्यय-१४/अर्थसंकल्प-१९/अर्थोपाय), मंत्रालय, मुंबई.
१५) सर्व प्रादेशिक रेशीम कार्यालये.
१६) सर्व जिल्हा रेशीम कार्यालये.
१७) अवर सचिव (का-१७ स), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
१८) निवड नस्ती (रेशीम कक्ष).